मालमत्ता व व्यवस्थापन कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र. :- मा/व्य/२७८१
दिनांक :- ९/८/२४

-: कार्यालयीन आदेश :-

विषय :- भाडे आणि सुरक्षा ठेव निर्धारण समितीमध्ये सादर करण्यात आलेल्या प्रस्तावांबाबत.
संदर्भ :- १. महाराष्ट्र महानगरपालिका (स्थावर मालमत्ता भाडेपट्टा नुतनीकरण अथवा हस्तांतरण) नियम २०२३.
२. महापालिका आयुक्त कार्यालय जा.क्र. मआ/माव्य/५८१८ दि. १५/१२/२०२३ रोजीचे कार्यालयीन आदेश.

संदर्भ क्र. १ अन्वये राज्यातील महानगपालिकेच्या मालमत्तेचे भाडेपट्ट्याद्वारे विनियोग करण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका (स्थावर मालमत्तेचे भाडेपट्ट्याद्वारे हस्तांतरण आणि भाडेपट्ट्याचे नूतनीकरण) नियम २०२३ हे नियम शासन राजपत्रात दि. ०६ नोव्हेंबर २०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आले आहेत. तसेच शासन निर्णय क्रमांक – नामपा१२२१/प्र.क्र.१६६/नवि-२६ नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासनचे दि. ०७ नोव्हेंबर २०२३ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका (स्थावर मालमत्तेचे भाडेपट्ट्याद्वारे हस्तांतरण आणि भाडेपट्ट्याचे नुतनीकरण) नियम २०२३ च्या प्रभावी अंमलबजावणी अतिरिक्त मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार संदर्भ क्र. २ चे कार्यालयीन आदेशान्वये पुणे महानगरपालिकेद्वारे भाडे आणि सुरक्षा ठेव निर्धारण समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

सदर समितीची माहे जून २०२४ रोजीची बैठक दि. ०२/०७/२०२४ रोजी पार पडली असून सदर बैठकीमध्ये पुणे महानगरपालिकेच्या मिळकती भाडे तत्वावर देणेबाबतचे प्रस्ताव सादर करण्यात आले असता बहुतांश मिळकतीमध्ये पुणे महानगरपालिकेच्या कार्यालयास आवश्यकता असल्यास प्रथम प्राधान्य देण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार सदर मिळकतींची यादी यासोबत जोडण्यात आली असून पुणे महानगरपालिकेतील ज्या खात्यांस सदर मिळकतीची आवश्यकता आहे, त्यांनी दि. १५/०८/२०२४ पूर्वी मालमत्ता व व्यवस्थापन कार्यालयामध्ये मागणी सादर करावयाची आहे.

(महेश पाटील)
उप आयुक्त तथा सदस्य सचिव,
भाडे आणि सुरक्षा ठेव निर्धारण समिती
मालमत्ता व व्यवस्थापन
पुणे महानगरपालिका

प्रत :- मा. खातेप्रमुख (सर्व), पुणे महानगरपालिका
यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी ...

| अ.क्र. | विषय | शेरा |
|---|---|---|
| १. | पुणे पेठ येरवडा फा.प्लॉ. क्र. ११ येथील हुले कॉम्प्लेक्स या व्यावसायिक इमारतीमधील गाळा क्र. १ व्यावसायिक वापरासाठी भाडेतत्वावर देणेकामी भाडे मुल्यांकन करून मिळणेबाबत. (क्षेत्र - २६.४५ चौ.मी.) | |
| २. | पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील पुणे पेठ घोरपडे फा. प्लॉट नं. १२७ म.न.पा. कॉलनी नं. ७ येथील गळा व्यवसायीक वापराकरिता भाडेतत्वावर देणेकामी भाडे रक्कम व सुरक्षा अनामत रक्कम निश्चित करून मिळणेबाबत.<br>(क्षेत्र - ३८.६५ चौ.मी.) | |
| ३. | पुणे पेठ मुंढवा स.नं. ८० हि.क्र. २+३+४/२ येथील व्यावसायिक गाळा भाडेतत्वावर देणेकामी भाडे रक्कम व सुरक्षा अनामत रक्कम निश्चित करून मिळणेबाबत.<br>(क्षेत्र - ४०.१३ चौ.मी.) | |
| ४. | पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील प्रेस्टीज अव्हेन्यू बाणेर पाषाण लिंक रोड पाषाण स.नं. १३०/२ येथील दुसऱ्या व तिसऱ्या मजल्यावरील ऑफीस १ व ऑफीस २ या उपलब्ध जागा वस्तू व सेवा अपील न्यायाधिकरण पुणे खंडपीठासाठी भाडेतत्वावर देणेसाठी भाडे रक्कम व सुरक्षा अनामत रक्कम निश्चित करून मिळणेबाबत.<br>(क्षेत्र - ९६४.५९ चौ. मी.) | |
| ५. | औंध बाणेर क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत पुणे पेठ बाणेर स.नं. २७०/१ मध्ये बांधण्यात आलेल्या इमारतीमधील तळ मजल्यावरील अंदाजे १५०० चौ.फुट हॉल नाट्य प्रशिक्षण व तालीम घेण्याकरिता भाडेतत्वावर देणेकामी भाडे रक्कम व सुरक्षा अनामत रक्कम निश्चित करून मिळणेबाबत. (क्षेत्र १५० चौ.मी. ) | |
| ६. | पुणे पेठ बाणेर स.नं. ८५ येथील स्मार्ट फार्मा इमारतीमधील तळ मजला व पाहीला मजल्यावरील हॉल भाडेतत्वावर देणेसाठी भाडे रक्कम व सुरक्षा अनामत रक्कम निश्चित करून मिळणेबाबत. NBT (क्षेत्र ८२८.३५ चौ.मी.) | |

9/L/2024

उप अधिक्षक

मालमत्ता व व्यवस्थापन